


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३०६, रविवार, २५ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# गणेश आढारींमुळे महसुल प्रशासन बदनाम!

## आढारींकडून होत असलेल्या अडवणूकीमुळे खा. नीलेश लंके संतप्त

### गरिबीची जाण असलेल्या अधिकाऱ्यांकडे पदभार सोपविण्याची मागणी

पारनेर : विशेष प्रतिनिधी

**नायब तहसिलदार गणेश आढारींमुळे महसूल प्रशासन बदनाम झाले आहे. त्यांच्याकडून अनेक विद्यार्थ्यांना दाखल्यांसाठी दिवस दिवस बसून ठेवले जाते. आढारी नागरिकांशी असभ्य भाषेत बोलतात. पोलीस भरतीसाठी दाखला न मिळाल्याने एका तरूणाची नोकरीची संधी हुकल्याचे सांगत खासदार नीलेश लंके यांनी महसूल प्रशासनाच्या कारभाराबाबत तिव्र शब्दात नाराजी व्यक्त केली.**

तालुक्यातील विविध शासकीय कार्यालयांतील अधिकाऱ्यांसमवेत खा. नीलेश लंके यांनी आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीत तहसिल कार्यालयाकडून होत असलेल्या अडवणूकीबाबत लंके यांनी खडे बोल सुनावले.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, ज्यांच्या तोंडात जन्मत: सोन्याचा चमचा आहे, त्यांच्याकडे संजय गांधी योजनेचा टेबल देऊ नका. गरीबांची जाण असणाऱ्या अधिकाऱ्याकडे त्याचा चार्ज द्या. एखाद्या वयोवृध्दाला आजारी पडल्यावर दवाखान्यात जाण्यासाठी पन्नास रूपये नसतात अशा लोकांची प्रकरणे नाकारण्यात आली आहेत. एचआयव्ही मुळे मुलगा सुन-मयत झाल्यानंतर त्यांच्या मुलांना ८० वर्षाची आजी सांभाळत आहे. त्या वृध्देचे प्रकरणही नामंजुर करण्यात आले. त्या वृध्देला या वयातही शेतामध्ये कामाला जाउन त्या मुलांचे संगोपन करावे लागते आहे. तहसिल कार्यालयात काय चालते हे मला सगळे माहीती आहे. गोरगरीब जनतेचा दुवा घ्यायला शिका असे सांगत लंके यांनी संजय गांधी निराधार योजना विभागातील कारभारावर नाराजी व्यक्त केली.

संजय गांधी निराधार योजनेची १ हजार ९४३ प्रकरणे सादर करण्यात आली होती. त्यापैकी तत्कालीन तहसिलदार शिवकुमार आवळकंठे यांनी १ हजार ४३ प्रकरणे मंजुर केली तर ९०० प्रकरणे नामंजुर करण्यात आली. सध्याच्या तहसिलदार गायत्री सौंदाणे यांनी १ हजार ३०० प्रकरणे मंजुर केली. ही प्रकरणे सादर करण्यात आल्यानंतर तलाठयांना याद्या देउन त्याची पडताळणी करण्यात आल्याची माहीती नायब तहसिलदार पाचर्णे यांनी दिली. त्यावर नामंजुर करण्यात आलेल्या प्रकरणांबाबतचे इतिवृत्त देण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी केली. अनेक प्रकरण सुरूवातीस पात्र ठरविण्यात आली व त्यानंतर ती अपात्र ठरविण्यात आल्याचा आरोपही यावेळी खा. लंके यांनी यावेळी केला.

### शेतपानंद रस्त्यांची कामे मार्गी लावा

*शेतपानंदच्या २८० कामांना तांत्रीक मंजुरी देण्यात आली असून एकही काम प्रलंबित नसल्याची माहीती यावेळी देण्यात आली. नगर कार्यालयाकडे २५ लाखांपेक्षा अधिक अंदाजपत्रक असलेली ६ प्रकरणे आली होती. या प्रकरणांना तांत्रीक मंजुरी देऊन प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याचेही सांगण्यात आले. शेतपानंद रस्त्याची कामे तातडीने करण्याच्या सुचना खा. लंके यांनी यावेळी दिली. जनतेकडून थेट डांबरी रस्त्याची मागणी करण्यात येत असून किमान शेत पानंद रस्त्याचे कामे झाली तर जनतेला दिलासा मिळेल असे खा. लंके यांनी सांगितले.*



खा. नीलेश लंके यांनी विविध शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांची शुक्रवारी आढावा बैठक घेतली.

### शासकीय कार्यालयांचे दुरध्वनी सुरू करा

*विविध शासकीय कार्यालयांमधील दुरध्वनी बंद आहेत. ते तात्काळ सुरू करण्याच्या सुचना खा. लंके यांनी दुरसंचार विभागाला केली. बहुतांश कार्यालयांतील दुरध्वनी बंद असल्याने नागरीकांना संपर्क साधता येत नाही. पोलीस ठाणे, शासकीय रूग्णालये येथील दुरध्वनी बंद असल्याने नागरीकांची मोठी कुचंबना होते. पोलीस ठाणे अथवा शासकीय रूग्णालयात रात्री अपरात्री संपर्क करायचा झाल्यास संबंधित अधिका-याच्या मोबाईलवर संपर्क करावा लागतो. दिवसभरच्या कामाच्या थकव्याने आराम करणा-या अधिकाऱ्यांना रात्री अपरात्री त्रास देणे योग्य वाटत नाही. त्यामुळे शासकीय कार्यालयांतील दुरध्वनी तात्काळ सुरू करण्याच्या सुचना खा. लंके यांनी यावेळी दिल्या.*

### वन विभागाच्या काम काजात सुधारणा करा

*वनविभागाचे अधिकारी कार्यालयात उपस्थित नसतात. नागरीकांचे फोन घेत नाहीत. बिबटयाचा त्रास असेल तर फटाके वाजविण्याचा सल्ला अधिकारी देतात. पिंजरे लावण्यास टाळाटाळ करण्यात येत असल्याचे खा. लंके यांनी यावेळी सांगितले. वन विभागाच्या कामकाजात सुधारणा करण्याच्या सुचना खा. लंके यांनी यावेळी दिल्या.*

### मी खासदार म्हणून मान्य नाही का ?

*लोकसभा निवडणूकीनंतर काही अधिकारी माझ्याकडे फिरकलेही नाहीत. त्यांना मी खासदार म्हणून मान्य नाही का असा सवाल करीत मी खासदार म्हणून मान्य नसेल तर तुम्हाला पंतप्रधानपद हवे का ? माझ्या विरोधातील उमेदवार विजयी झाला असता तर दादा, साहेबांना भेटण्यासाठी सकाळी सहा वाजताच तुम्ही बुके घेउन गेला असता. मी कुणाच्या पोटी जन्म घ्यावा हे माझ्या हातात नाही. परंतू लोकप्रतिनिधींचा सन्मान करायला शिका असे सांगत खा. लंके यांनी काही अधिकाऱ्यांना चांगलेच खडसावले.*

### आडनाव लंके म्हणून सुड भावनेने कारवाई करता काय ?

*बाळासाहेब लंके नावाच्या व्यक्तीने १ हजार गौण खनिज उत्खननासाठी रॉयल्टी शासनाकडे जमा केली. लंके यांनी ३५० ब्रासचे उत्खनन करून ६५० ब्रासचे उत्खनन शिल्लक असताना महसूल विभागाने स्टोन क्रशर सिल करून ४६ लाख रुपये दंडाची नोटीस बजावली. याचा खुलासा खा. लंके यांनी तहसीलदार गायत्री सैदाणे यांच्याकडे मागितला असता त्यांनी मला वरिष्ठांनी कारवाईचे आदेश दिले होते असे उत्तर दिले. त्यावर शहानिशा करून तसा अहवाल का पाठविला नाही असा सवाल लंके यांनी केल्यावर मात्र निरुत्तर झाल्या.*

### संरक्षण विभागाने ताब्यात दिलेली वाळूची गाडी सोडली

*संरक्षण विभागच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या हद्दीमध्ये वाळू चोरताना पकडलेली वाळूची गाडी महसूल विभागाकडे देण्यात आली. तहसिलदारांनी ही गाडी का सोडली असा प्रश्न खा. लंक यांनी यावेळी उपस्थित केल्यानंतर तहसिलदार गायत्री सौंदाणे निरूत्तर झाल्या. लोकसभा निवडणूकीची आचारसंहीता असतानाही तहसिलदार राजकीय पुढाऱ्याच्या बैठकीस उपस्थित राहतात. अशी चुकीची काम करू नका. तहसिलदार म्हणून तुमचे काय अधिकार आहेत हे पहा. अनेक वर्षानंतर पुजा खेडकर प्रकरण उजेडात आले. कीतीही वर्षे झाली तरी माहीती बाहेर येते याची भान ठेवा असा गर्भीत इशाराही खा. लंके यांनी यावेळी दिला.*

# पुण्याच्या पौड भागात हेलिकॉप्टर कोसळले; सुदैवाने जीवितहानी नाही

पुणे :प्रतिनिधी

**पुणे जिल्ह्यातील पौड भागात घोटोडे भागाच्या हद्दीत एका डोंगराजवळ हेलिकॉप्टरचा सांगाडा सापडला आहे. मुंबईतून उड्डाण केलेले हेलिकॉप्टर आंध्र प्रदेशला जात असताना दुर्घटनाग्रस्त झाल्याची माहिती आहे. हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह एकू चार प्रवासी होते, त्यापैकी दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झाली नसल्याचं वृत्त आहे. स्थानिकांनी तातडीने अपघात स्थळी धाव घेत मदतकार्य सुरु केले.**

पुणे जिल्ह्यातील पौड भागात हेलिकॉप्टर कोसळून अपघात झाला आहे. पुण्यात दिवसभर पावसाचा जोर पाहायला मिळत आहे. त्यामुळे खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर पडल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवला जात आहे. पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून बचाव यंत्रणाही कामाला लागली आहे.

### आकाशात गिरक्या खात पडलं

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, पुण्यातील पौड भागात गारवा हॉटेलजवळ एक हेलिकॉप्टर अचानक आकाशात गिरक्या खाताना दिसलं. त्यानंतर मोठा आवाज झाला आणि हेलिकॉप्टर जमिनीवर कोसळलं. अपघातग्रस्त हेलिकॉप्टरमध्ये चार प्रवासी होते. त्यापैकी दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. सध्या शंभरहून अधिक जण घटनास्थळी जमा झाल्याचं प्रत्यक्षदर्शींनी सांगितलं.

# महायूती सरकारने सत्तेवरून पायउतार व्हावे

### आ.बाळासाहेब थोरात यांची मागणी

संगमनेर :प्रतिनिधी

**आपण चाळीस वर्षे राज्याच्या राजकारणात आहोत. मात्र इतके वाईट राजकारण कधीही पाहिले नाही. जनतेमध्ये या सरकारविरुद्ध मोठा रोष आहे. बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत या सरकारने सत्तेवरून पायउतार व्हावे किंवा केंद्र सरकारने राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे नेते आमदार बाळासाहेब थोरात यांनी केली.**

बदलापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ संगमनेरमध्ये आमदार थोरात यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीच्या वतीने तोंडाला काळी पट्टी लावत, काळे झेंडे घेऊन या घटनेचा निषेध करण्यात आला. यावेळी माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, युवककाँग्रेसअध्यक्ष डॉ. जयश्री थोरात, बाबासाहेब ओहोळ, ड. माधवराव कानवडे, शिवसेनेचे अमर कतारी, आप्पा केसेकर, इसाकखान पठाण यांच्यासह काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेनाया पक्षांचे कार्यकर्ते, पदाधिकारी व युवक काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.




आंदोलनानंतर माध्यमांशी बोलताना आमदार थोरात म्हणाले की, बदलापूरची घटना ही अत्यंत लांछनास्पद आहे. संस्थाचालकांनी हे प्रकरण दाबून टाकण्याचा प्रयत्न केला. त्याला पोलिसांची साथ मिळाली. मंत्रालयामधून दबाव होता की काय असे महाराष्ट्राला वाटत आहे. लाडकी बहीण योजना सर्वत्र सुरू आहे. मंत्रिमंडळ बहिणीकडून राख्या बांधून फोटोसेशन करत आहे. मात्र या बहिणीचे रक्षण करण्यास सरकार अपयशी ठरले आहे. मागच्या आठ दिवसांपासून महिलांवरील अत्याचाराच्या खूप घटना घडल्या आहेत. प्रशासनाचा धाक राहिला नाही. मंत्रालयात सर्व फक्त टक्केवारीत गुंतले आहेत.

बदलापूरमध्ये जनता एकत्र येऊन निदर्शने करत होती. सत्ताधारी मात्र त्याला राजकीय हेतू म्हणतात हे चूक आहे. न्यायालयाचा मान राखत आम्ही मूक आंदोलन केले. यालाही आता राजकीय हेतू म्हटला जात आहे. खरे तर हे सरकारच दुर्दैवी राजकारण करत आहे. राज्यात बालिका व महिला सुरक्षित नसून सरकारला सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही तसेच कायदा सुव्यवस्था ढासळलेल्या महाराष्ट्रात तातडीने राष्ट्रपती राजवट लागू करावी अशी मागणी आमदार थोरात यांनी केली आहे.

# शरद पवारांनी दिली महिला सुरक्षेची शपथ




### महाराष्ट्राच्या नावलौकिकाला धक्का बसल्याची खंत

पुणे : प्रतिनिधी

**बदलापूरमध्ये तीन वर्षांच्या चिमुकल्या मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला. त्यानंतर महाराष्ट्रासह देशभरातून त्यावर संतप्त प्रतिक्रिया येत आहेत. या घटनेचा निषेध करण्यासाठी विरोधी पक्षांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंदला उच्च न्यायालयाने परवानगी नाकारली. त्यानंतर विरोधकांनी राज्यात विविध ठिकाणी आंदोलनाचा पवित्रा घेतला. पुणे रेल्वे स्थानकाच्या बाहेर आज राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाकडून भर पावसात आंदोलन करण्यात आले. यावेळी एकीकडे सुप्रिया सुळेंनी हल्लाबोल केला असताना शरद पवारांनी उपस्थितांना महिला सुरक्षेची शपथ दिली.**

### काय म्हणाले शरद पवार?

पुणे स्थानकाबाहेर शरद पवार गटाचे कार्यकर्ते, पदाधिकारी व नेते यांनी आंदोलन केले. यावेळी शरद पवारांनी मुख्यमंत्रीएकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसवअजित पवारयांच्या कारभारावर टीका केली. एका अस्वस्थ करणाऱ्या प्रसंगाच्या निमित्ताने आज आपण एकत्र आलो आहोत. बदलापूरला बालिकेवर जो अत्याचार झाला, त्यामुळे सबंध देशात महाराष्ट्राच्या नावलौकिकाला प्रचंड धक्का बसला. महिलांच्या रक्षणाची जबाबदारी आजच्या राज्यकर्त्यांवर आहे. पण त्याची जाण राज्यकर्त्यांना राहिलेली नाही. त्यामुळे बदलापूरचा प्रकार झाल्याचा निषेध होत असताना आणखी काही ठिकाणी अशाच दुर्दैवी घटना घडल्या, असं शरद पवार म्हणाले.

एक दिवस महाराष्ट्रात असा जात नाही. कुठे ना कुठे भगिनींवरच्या अत्याचाराची बातमी वाचायला मिळते. हे राज्य शिवछत्रपतींचं आहे. त्यांनी आपल्या राजवटीत एका महिलेवर अत्याचार झाल्याची तक्रार आल्यानंतर त्या आरोपीचे हात कलम करण्याची शिक्षा दिली होती, अशा शब्दांत शरद पवारांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या.

### सत्ताधाऱ्यांवर शरद पवार यांचा हल्लाबोल

आजच्या स्थितीत जे घडलं त्याची गांभीर्यानं नोंद सरकारनं घेतली पाहिजे. संवेदनशील भूमिका घेतली पाहिजे. मला एका गोष्टीचं दु:ख होतंय की राज्यकर्ते, राज्याचे प्रमुख आणि त्यांचे काही सहकारी म्हणतायत की बदलापूरच्या प्रकरणात विरोधक राजकारण आणतायत. मुलीबाळींवरील अत्याचाराबाबत कुणी आवाज उठवला तर त्याला राजकारण म्हणायचं हा निष्कर्ष राज्यकर्ते काढत असतील तर राज्यकर्ते किती असंवेदनशील आहेत, भगिनींकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन किती चमत्कारिक आहे याची प्रचिती आपल्या सगळ्यांना येते, अशा शब्दांत शरद पवारांनी सरकारवर टीकास्त्र सोडलं.

### शरद पवारांनी उपस्थितांना दिली शपथ!

दरम्यान, यावेळी शरद पवारांनी सर्व उपस्थित आंदोलकांना महिला सुरक्षेची शपथ घेण्याचं आवाहन केलं. मी, अशी शपथ घेतो की, मी स्त्रियांवर होणारा हिंसाचार कधीही खपवून घेणार नाही. माझे घर, माझा परिसर, माझे गाव, माझे कार्यालय अशा कोणत्याही ठिकाणी जर महिलांची छेडछाड किंवा अत्याचार होत असेल, तर त्यास मी विरोध करून त्याबद्दल आवाद उठवीन. मी मुलगा आणि मुलगी असा भेदभाव कधीही करणार नाही. महिलांचा सन्मान राखीन आणि या पुण्यनगरीत, महाराष्ट्रात आणि देशात महिलांसाठी अधिकाधिक सुरक्षित व भयमुक्त स्थिती बनवण्यासाठी प्रयत्न करीन. जय हिंद, अशी शपथ यावेळी शरद पवारांपाठोपाठ आंदोलकांनी घेतली.



फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी

# डाग, रुक्षपणा कमी करेल चंदन फेस पॅक



चंदनमधील गुणधर्मांमुळे त्वचेचा कोरडेपणा दूर होतो. नियमित स्वरुपात चेहऱ्यावर चंदन पॅक लावा आणि सुकल्यानंतर थंड पाण्यानं चेहरा स्वच्छ धुऊन घ्या. या फेस पॅकमुळे तुमच्या चेहऱ्यावर चमक येईल आणि काळे डाग देखील दूर होतील. चेहऱ्यावर नैसर्गिक तेज येण्यासाठी चंदनाचा फार पूर्वीपासून वापर केला जातो. ब्युटी केअर रुटीनमधील हा आयुर्वेदिक उपाय आहे. चंदनमध्ये जास्त प्रमाणात औषधी गुणधर्माचा साठा आहे. यातील घटकांमुळे त्वचेवरील डाग, मुरुम आणि त्वचेचा रुक्षपणा कमी होतो. यामुळेच आयुर्वेदामध्ये चंदनला भरपूर महत्त्व आहे. हिवाळ्यामध्ये काही लोक अंगावर चंदन लेप लावून आंघोळ करतात. यामध्ये अँटी बॅक्टेरिअल गुणधर्म आहेत. ज्यामुळे त्वचेशी संबंधित समस्या दूर होण्यास मदत मिळते. चंदन आणि दूध एकत्र करून चेहऱ्यावर लावल्यास त्वचा उजळण्यास मदत मिळते. कडक उन्हामुळे त्वचेचं भरपूर नुकसान होतं. उन्हामुळे त्वचेवरील डाग कमी करण्यासाठी चंदन पावडरचा वापर करावा. चंदनामुळे मुरुम, डाग, डार्क सर्कल यासारख्या त्वचेच्या समस्या कमी होतात.

## त्वचेच्या समस्या

धावपळीचे आयुष्य, अपुरी झोप, ताणतणाव इत्यादी गोष्टींमुळे त्वचेच्या समस्या निर्माण होतात. या समस्यांपासून दूर राहण्यासाठी चंदन फेस पॅकचा वापर करून पाहा. चंदनाचे तेल देखील त्वचेसाठी लाभदायक असतं. चेहऱ्याचे डाग कमी करण्यासाठी एक चमचा चंदन पावडरमध्ये एक चमचा दूध आणि चिमूटभर हळद मिक्स करून फेस पॅक तयार करा. हे मास्क आपल्या चेहऱ्यावर २० मिनिटांसाठी लावून ठेवा आणि यानंतर चेहरा थंड पाण्याने धुऊन घ्या.

## त्वचा हायड्रेट


त्वचा हायड्रेट नसल्याच्या कारणामुळे कोरडी होऊ लागते. यामुळे त्वचेच्या समस्या निर्माण होऊ लागतात. चंदनमध्ये नैसर्गिक स्वरुपात असणारे तेल त्वचेचा कोरडेपणा कमी करतात. एक चमचा चंदन पावडरमध्ये दोन चमचे गुलाब पाणी मिक्स करून जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट कापसाच्या मदतीनं चेहऱ्यावर लावा आणि सुकल्यानंतर थंड पाण्याने चेहरा धुऊन घ्या.

- सन टॅन कमी होतं : सन टॅनिंग कमी करण्यासाठी चंदन फेसपॅक फायदेशीर आहे. एक चमचा संत्र्याच्या पावडरमध्ये एक चमचा चंदन आणि दोन चमचे दही मिक्स करा. जाडसर पेस्ट तयार करा. १५ मिनिटांसाठी हे मास्क चेहऱ्यावर लावा. यानंतर चेहरा थंड पाण्याने स्वच्छ धुऊन घ्या. या मास्कमुळे त्वचेवर नैसर्गिक चमक येईल आणि काळे डाग देखील हळूहळू कमी होतील.
- शरीरावरील सूज कमी होते : चंदनमुळे शरीरावर आलेली सूज कमी होते. चेहऱ्यावरील मुरुमांचा त्रास, मुरुमांमुळे होणारा दाह कमी होतो. मुरुम आणि चेहऱ्यावरील सूज कमी करण्यासाठी एक चमचा धणे पावडर, एक चमचा चंदन आणि दोन चमचा दही एकत्र घ्या आणि मिक्स करा. ही पेस्ट चेहऱ्यावर १५ मिनिटांसाठी चेहऱ्यावर लावा. या फेस मास्कमुळे त्वचेवरील मुरुम कमी होतील. चंदनमुळे त्वचेला थंडावा मिळतो. हे मास्क नियमित लावल्यास त्वचा हायड्रेट राहील.
- एस्ट्रिंजेंटप्रमाणे करते काम : चंदनमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीनचा समावेश आहे. हे घटक तुमची त्वचा खोलवर स्वच्छ करतात. त्वचा मऊ ठेवण्याचं कार्य करतात. रोमछिद्रांमधील दुर्गंध स्वच्छ करतात. कोणत्याही फेस मास्कमध्ये तुम्ही चंदनाचा उपयोग करू शकता. चंदनामध्ये अँटी सेप्टिक गुणधर्म आहेत. जे काही मुरुम आणि दुखापत भरून काढण्याचे काम करतात. चेहऱ्यावर जमा झालेली धूळ, माती स्वच्छ करण्याचे काम चंदनमधील घटक करतात.

# त्वचेसाठी चंदन तेलाचे 6 फायदे

**चंदनाचे तेल जगभरातील सौंदर्य उत्पादनांमध्ये वापरले जाते. त्वचेसाठी चंदन किती फायदेशीर आहे हे आपल्यापैकी अनेकांनी आजी-आजोबांकडून ऐकले असेलच. विशेषतः मुरुमांसाठी. पण तुम्हाला माहित आहे का की चंदनाचा वापर केवळ मुरुमांपासून सुटका करण्यासाठीच नाही तर त्वचेच्या अनेक समस्यांपासून सुटका मिळवण्यासाठी केला जातो. चला तर मग जाणून घेऊया त्वचेसाठी चंदनाच्या तेलाचे फायदे...**

- पिंपल्स आणि काळे डाग काढून टाकते : चंदन तेल पिंपल्स आणि त्यांच्यामुळे होणारी जळजळ शांत करते. यासाठी चंदनाच्या तेलात हळद आणि कापूर मिसळा. आता हे पिंपल्सवर लावा आणि रात्रभर राहू द्या. सकाळी पाण्याने स्वच्छ धुवा. तुम्हाला यामुळे नक्कीच फरक मिळेल.
- चंदन एक्जिमावर उपचार करते : एक्जिमापासून मुक्त होण्यासाठी, तुम्हाला त्या भागावर चंदनाच्या तेलाचे १ ते २ थेंब टाकावे लागतील. यामुळे तुम्हाला काही दिवसांत फरक जाणवेल.
- त्वचेवरील डाग दूर होतात : चंदनाच्या वापराने चेहऱ्यावरील डाग किंवा जखमाही नाहीशा होतात आणि त्वचा मुलायम होते. जर तुम्हाला यासाठी चंदनाचे तेल सापडत नसेल तर तुम्ही चंदन पावडरदेखील वापरू शकता. तुम्हाला फक्त तुमच्या त्वचेनुसार यात तेल मिक्स करायचे आहे आणि ते किमान १२ तास तसंच ठेवून द्यायचं आहे. त्यानंतर चेहऱ्यावर या तेलाने मसाज करा आणि काही मिनिटे राहू द्या. नंतर पाण्याने स्वच्छ धुवा.
- घामोळ्याची समस्या दूर होते : चंदन थंडगार आहे. त्यामुळे ते त्वचेवर लावल्याने थंडी आणि आराम मिळतो. जर तुम्हीही उन्हाळ्यात घामोळ्याने हैराण असाल, तर चंदनाची पेस्ट त्वचेवर लावा. अगदी लहान मुलांनाही तुम्ही हे लावू शकता.
- अँटी-टॅनिंग गुणधर्म असतात : चंदनाचे तेल त्वचेच्या टॅनिंगपासून मुक्त होण्यास देखील मदत करते. यासाठी मध, लिंबाचा रस आणि दह्यात चंदनाचे तेल किंवा पावडर मिसळून पेस्ट तयार करा. आता ही पेस्ट चेहऱ्यावर लावा आणि १५ ते २० मिनिटे राहू द्या. कोरडे झाल्यावर पाण्याने स्वच्छ धुवा
- एंटी-एजिंग गुणधर्म असतात : चंदनाचे तेल त्वचा सैल होऊ देत नाही. हे अँटी-ऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे आणि फ्री रॅडिकल्समुळे होणाऱ्या नुकसानाशी लढते. ज्यामुळे सुरकुत्या पडत नाहीत. यासाठी चंदनाच्या तेलात मध आणि अंड्यातील पिवळ बलक मिसळावे लागेल. हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्यावर लावा आणि नंतर पाण्याने धुवा.



# सौंदर्य खुलवणारी मुलतानी माती!

**आपल्या चेहऱ्याची त्वचा नितळ आणि मुलायम असावी यासाठी अनेकजण प्रयत्नशील असतात. विशेषतः मुलींमध्ये चेहरा चांगला दिसावा यासाठी विशेष प्रयत्न सुरू असलेले दिसतात. कधी चेहऱ्यावर येणारे पुरळ, डाग, कोरडेपणामुळे निघणारी स्कीन यांसारख्या समस्यांमुळे वैताग होतो. मग यावर नेमका कोणता उपाय करावा हे माहित नसल्याने त्याकडे दुर्लक्ष केले जाते. पण त्यामुळे ही समस्या आणखी वाढते. काहीजण चेहरा उजळण्यासाठी बाजारात मिळणाऱ्या सौंदर्यप्रसाधनांचाही वापर करतात, तर काही जण पार्लरमध्ये जाणे पसंत करतात. पण भारतीय आयुर्वेदातील घटक असलेली मुलतानी माती चेहरा उजळण्यासाठी अतिशय उपयुक्त ठरते. तसेच चेहऱ्याचा कोरडेपणा दूर करण्यासाठीही या मातीचा लेप फायदेशीर ठरतो. चेहरा कोरडा पडणाऱ्यांसाठी या टिप्स नक्कीच उपयुक्त ठरतात. बाजारात ही मुलतानी माती सहज उपलब्धही होते. पाहूया या मुलतानी मातीचा नेमका कसा उपयोग केल्यास त्याचा फायदा होतो...**

- मध आणि मुलतानी माती : मध हाही एक उत्तम आयुर्वेदीक पदार्थ असून तो आरोग्याच्या विविध समस्यांसाठी फायदेशीर असतो. १ चमचा मधात एक चमचा मुलतानी माती एकत्र करा. हा लेप चेहऱ्याला एकसारखा लावून तो २० मिनिटांसाठी ठेवा. त्यानंतर साध्या पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. मग चेहऱ्याला एखादे मॉईश्चरायजर लावा. चेहऱ्याचा कोरडेपणा दूर होण्यासाठी हा प्रयोग आठवड्यातून एकदा करा.
- चंदन पावडर आणि मुलतानी माती : एक चमचा मुलतानी मातीमध्ये १ ते २ थेंब गुलाबपाणी घाला. त्यात अर्धा चमचा चंदन पावडर घाला. हे मिश्रण योग्य पद्धतीने एकत्र करुन ते चेहऱ्याला लावा. हा लेप २० मिनिटे ठेऊन कोमट पाण्याने चेहरा धुवा. चेहरा उजळ होण्यासाठी ही प्रक्रिया आठवड्यातून २ वेळा करावी.
- दही आणि मुलतानी माती : एक चमचा दही आणि एक चमचा मुलतानी माती एकत्र करा. हा लेप चेहऱ्यावर लावून तो पूर्णपणे वाळू द्या. मग कोमट पाण्याने चेहरा धुवा. दह्यातील घटक चेहऱ्यासाठी उपयुक्त असतात. हे मिश्रण मुलतानी मातीमध्ये एकत्र केल्याने त्याचा चांगला फायदा होतो.
- हळद आणि मुलतानी माती : हळदीलाही आयुर्वेदात विशेष महत्त्व आहे. पाव चमचा हळद, २ चमचे मध आणि १ चमचा मुलतानी माती एकत्र करा. हे मिश्रण २० मिनिटे चेहऱ्याला लावून ठेवा आणि मग चेहरा पाण्याने धुवा.

# मुलतानी मातीसोबत 'ही' गोष्ट वापरा अन् उन्हाळ्यात मिळवा तजेलदार चेहरा

**उन्हाळा आता सुरू झाला असून या दिवसात उष्ण वारे आणि कडक सूर्यप्रकाश त्वचेचा सर्व रंग काढून घेत आहेत. या दिवसांमध्ये उष्णतेचा सर्वाधिक परिणाम चेहऱ्यावर दिसून येत आहे. कडक उन्हामुळे चेहऱ्याला जळजळ, घाम येणे, खाज सुटणे, टॅनिंग अशा समस्या सतावत आहेत. काही वेळ बाहेर फिरल्यानंतर चेहऱ्याला घाम येऊ लागतो आणि चेहरा लाल होऊ लागतो आणि चेहऱ्यावर पुरळ येणे सुरू होते. उन्हाळ्यात चेहरा थंड ठेवण्यासाठी मुलतानी माती आणि पुदिना पॅक प्रभावी आहे.**

पॅकमध्ये असलेले पुदिना त्वचेला थंड बनवते आणि त्वचेचा टोन देखील उजळ करते. तुम्ही हा पॅक वापरला तर तुमच्या त्वचेचा टोन एकसमान करतो आणि ब्लॅक हेड्सपासूनही सुटका करतो. डोळ्यांखाली काळी वर्तुळे असतील तर हा पॅक वापरणे फायदेशीर ठरेल. जर तुम्हीही उन्हाळ्यात त्वचेच्या समस्यांनी त्रस्त असाल तर मुलतानी माती आणि पुदिन्याचा पॅक लावा. हा पॅक लावल्याने घाम येणे तर कमी होईलच, सोबतच तुमचा चेहराही मस्त होईल. हा पॅक तुम्ही उन्हाळ्यात घरी बनवू शकता. हा पॅक लावल्याने चेहऱ्यावर ग्लो येईल आणि चेहऱ्याची त्वचा थंड राहील.

## त्वचेचे फायदे

मुलतानी माती आणि पुदिना पॅक उष्णतेमध्ये चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल काढून टाकते आणि तेल नियंत्रित करते. हा पॅक लावल्याने तुमच्या त्वचेची होणारी जळजळ आणि उष्णतेपासून आराम मिळतो. तसेच तुम्ही उन्हाळ्यात जास्त उन्हात राहिल्यास हा पॅक वापरा.

## पॅक कसा तयार करायचा ?

हा पॅक बनवण्यासाठी एका भांड्यात दोन चमचे मुलतानी माती घ्या. आता पुदिना मिक्सरमध्ये किंवा जाळीवर बारीक करून घ्या. लक्षात ठेवा त्यात जास्त पाणी घालू नका. पुदिन्याची ही पेस्ट मुलतानी मिक्स करून चांगली पेस्ट बनवा. तयार केलेली पेस्ट चेहऱ्यापासून मानेपर्यंत लावा आणि १५ मिनिटे कोरडे होऊ द्या. १५ मिनिटांनी चेहरा थंड पाण्याने धुवा, उन्हाळ्यात चेहरा थंड राहील.





# कोंडा, केसगळतीच्या त्रासातून हवीय सुटका? मुलतानी मातीचे ६ हेअर पॅक!

**त्वचा आणि केसांची देखभाल करण्यासाठी 'मुलतानी माती' रामबाण उपाय आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून ब्युटी केअर रूटीनमध्ये याचा वापर केला जात आहे. डाग, मुरुम, त्वचेचा रंग आणि पोत चांगला करण्यासाठी तसंच केसांशी संबंधित समस्या दूर करण्यासाठी मुलतानी माती हा अतिशय प्रभावी उपाय मानला जातो. मुलतानी मातीमध्ये भरपूर प्रमाणात नैसर्गिक गुणधर्मांचा समावेश आहे. यातील पोषक घटकांमुळे केसांवर सकारात्मक परिणाम होतो. या आयुर्वेदिक उपायामुळे केस तुटणे, केसगळती, कोंडा या समस्या कमी होऊन तुमचे केस घनदाट, काळेशार आणि लांबसडक होण्यास मदत मिळू शकते. केसांचं आरोग्य निरोगी राहावं, यासाठी तुम्ही मुलतानी माती हेअर पॅकचा वापर केल्यास फायदेशीर ठरू शकते. यापासून कित्येक पोषण तत्त्वांचा तुमच्या केसांना पुरवठा होईल. निर्जीव केसांचीही समस्या कमी होऊ शकते.**

- तुटणाऱ्या केसांची समस्या : केसं तुटणे ही एक सामान्य समस्या आहे आणि यामुळे अनेक जण त्रस्त देखील असतात. केस तुटणे आणि केसगळतीची समस्या कमी करण्यासाठी आठवड्यातून दोन वेळा मुलतानी माती हेअर पॅकचा वापर करा. मुलतानी माती आणि दही एकत्र घ्या आणि त्याचा हेअर पॅक तयार करा. हेअर पॅक चांगल्या पद्धतीनं केसांना लावा. एक तास पॅक केसांवर राहू द्या. यानंतर कोमट पाणी आणि सौम्य स्वरुपातील शॅम्पूनं केस स्वच्छ धुऊन घ्या. हा उपाय केल्यास केसगळतीची समस्या कमी होईल.
- लांबसडक केस : आपले केस लांबसडक आणि घनदाट असावेत, अशी इच्छा प्रत्येक तरुणीची असते. पण धूळ, माती आणि प्रदूषणाचा केसांवर वाईट परिणाम होतो. केसांची योग्य देखभाल न केल्यास त्यांची अवस्था आणखी वाईट होऊ शकते. मुलतानी मातीमुळे केसांना खोलवर पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. ज्यामुळे केसांची वाढ देखील चांगल्या प्रकारे होते. एका वाटीमध्ये मुलतानी माती आणि रीठा पावडर एकत्र घ्या. यामध्ये आवश्कतेनुसार पाणी मिक्स करा. जाडसर हेअर पॅक तयार करून घ्या. आता केसांना हा पॅक लावा आणि अर्ध्या तासानंतर थंड पाण्यानं केस स्वच्छ धुऊन घ्या. हा उपाय आठवड्यातून तीन वेळा केल्यास केसगळती कमी होईल.



- कोरड्या केसांची समस्या : मऊ केसांसाठी मुलतानी माती, दही आणि तिळाच्या तेलाचा वापर करावा. या तिन्ही सामग्री वाटीमध्ये एकत्र घ्या आणि हेअर पॅक तयार करा. आता हा पॅक टाळू, केस आणि केसांच्या मुळांना लावा. १५ ते २० मिनिटांनंतर केस थंड पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. थोड्या वेळानं केसांना शॅम्पू लावून केस धुऊन घ्या आणि कंडिशनर देखील लावा. शक्यतो केमिकल फ्री शॅम्पूचा वापर करावा. या हेअर पॅकमुळे केसांना भरपूर प्रमाणात पोषण तत्त्वांचा पुरवठा होतो. या पॅकमुळे केसांवर नैसर्गिक चमक येण्यास मदत मिळते.
- केसांना मॉइश्चराइझ करण्यासाठी : केसांची चमक वाढवण्यासाठी ऑलिव्ह ऑइलचा वापर करा. हे तेल थोडेसे गरम करून घ्या. तेल उकळू नये, केवळ कोमट करावं. आता या तेलानं केसांचा हलक्या हातानं मसाज करावा. यानंतर मुलतानी मातीमध्ये लिंबू रस, एक चमचा मध आणि दह्याचा समावेश करून हेअर पॅक तयार करा. एक तासांनंतर केस थंड पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. या हेअर पॅकमुळे केस मऊ होतात. तसंच केसांमधील नैसर्गिक ओलावा टिकून राहतो.
- तेलकट केसांसाठी हेअर पॅक : मुलतानी मातीमुळे केसांमधील अतिरिक्त तेल कमी होण्यास मदत मिळते. पाण्यामध्ये मुलतानी माती मिक्स करून जाडसर पेस्ट तयार करा. ही पेस्ट केसांना लावा. एक तासानंतर केस पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. या पॅकमुळे तेलकट केसांची समस्या कमी होईल.
- कोंडा कमी करण्यासाठी : सामग्री : मुलतानी माती, मेथी दाण्यांची पावडर, एक चमचा लिंबू रस. मेथीची पावडर रात्रभर भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी सकाळी भिजलेली मेथी पावडर, मुलतानी माती आणि एक चमचा लिंबू रस वाटीमध्ये एकत्र घ्या आणि पेस्ट तयार करून घ्या. हा पॅक टाळूवर लावा. हा पॅक केसांच्या मुळांपासून ते केसांच्या टोकांपर्यंत लावायचा आहे, हे लक्षात घ्या. अर्ध्या तासांनंतर केस थंड पाण्यानं स्वच्छ धुऊन घ्या. केसांसाठी केमिकल फ्री शॅम्पूचा वापर करावा. तुम्ही आठवड्यातून एकदा हा उपाय करू शकता. या हेअर पॅकमुळे केसांमध्ये जमा झालेली दुर्गंध बाहेर फेकली जाते. केसांच्या वाढीसाठी आपल्या टाळूवरील त्वचा निरोगी असणं आवश्यक आहे.

## शॉर्ट न्यूज

### झेडपी देणार ९३२ शिकाऊ सेवकांना संधी

नगर : मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेंतर्गत नगर जिल्हा परिषदेच्या मोठ्या प्राथमिक शाळांमध्ये संगणक डाटा एन्ट्रीचे काम यासह अन्य कौशल्य असणाऱ्या ९३२ जागांवर विद्या वेतन (मानधन) तत्वावर प्रशिक्षित प्रशिक्षणार्थी यांची नेमणूक करण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा रोजगार विभागाकडे नोंदणी असणाऱ्या उमेदवारांची यादी घेऊन तालुका पातळीवर गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्फत या नेमणुका करण्यात येणार आहेत.

### पंडित यांना राज्यस्तरीय युवा रत्न पुरस्कार

राहुरी : तालुक्यातील दे. प्रवरा येथील संदीप बाळासाहेब पंडित यांना राज्यस्तरीय युवा रत्न पुरस्कार देउन सन्मानित केले. ग्रामीण भागाच्या विकासासाठी विविध कंपन्यांच्या सीएसार फंडाच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजना सर्वसामान्या पर्यंत पोहोचविण्याचे निस्वार्थी काम करणारा युवक म्हणून जिल्हात नावलौकिक आहे. त्याचा विचार करुन स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्याच्या माध्यमातून राज्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणारा आदर्श व्यक्ती संदिप पंडित यांना राज्यस्तरीय युवारत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.

### प्रफुल्ल करंजेकरची वुशू स्पर्धेत निवड

पारनेर : पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य सीनियर ओपन वुशू निवड चाचणी घेण्यात आली त्यामध्ये ५२ किलो वजन गटात प्रफुल सुभाष करंजेकर यांनी पहिला क्रमांक पटकावून राष्ट्रीय स्पर्धे चे तिकीट मिळवले आहे. प्रफुल याची पहिलीच सिनियर स्पर्धा होती त्यात त्याला यश आले आहे. याआगोदर ज्युनियर राष्ट्रीय स्पर्धेसाठी दोनदा तर राष्ट्रीय सिनियर स्पर्धे त पहिल्यांदाच निवड झाली आहे. प्रफुल्ल करंजेकर हा पोखरी, ता. पारनेर गावचे मा. उपसरपंच सुभाष करंजेकर यांचा मुलगा आहे.

### दरोड्याच्या तयारीतील सहा आरोपींना अटक

कोपरगाव : गस्तीवर असलेल्या पोलिसांना ऑटो रिक्षात असलेल्या सहा जणांवर संशय आला. त्यांनी विचारपूस केली असता त्यांच्याजवळ कोयते, चाकू, पक्कड आदी साहित्य आढळले. हे सहा जण दरोड्याच्या तयारीत होते. त्यांच्यावर कोपरगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुषार अभय गोरडे मंदार अशोक लोखंडे, भारत सुभाष ब्राम्हणे अमोल लक्ष्मण जाधव अशी अटक करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. या घटनेत दोघे फरार आहेत. त्यांचा शोध पोलीस घेत आहेत.

### सीना धरणात आले ३.५ टीएमसी पाणी

कर्जत : आमदार रोहित पवार यांनी भोसे खिंडीतून सीना धरणात गेल्या पाच वर्षात तब्बल ३. ५ टीएमसी पाणी आणल्याने या धरणाच्या लाभ क्षेत्रातील २१ गावांमधील शेतकऱ्यांना चार आवर्तन जास्त मिळाले. यामुळे शेतकरी वर्गामधून समाधान व्यक्त केले जात आहे. कर्जत तालुक्यातील सीना धरण हे २. ४० टीएमसीचे असून या धरणावर निमगाव गांगर्डा, घुमरी, बेलगाव, मिरजगाव, नागलवाडी, नागापूर या गावांसह २१ गावांतील शेतकऱ्यांना वर्षभरात दोन ते तीन आवर्तने सोडली जातात.

# गुलाबी गँगकडून पैशांची उधळपट्टी!

## सरकारच्या पैशांवर जनसन्मान यात्रा सुरू; आ. रोहित पवार यांचा आरोप

इंदापूर : प्रतिनिधी

**जनसन्मान यात्रेद्वारे गुलाबी गँगने पैशांची उधळपट्टी लावल्याचे आपण पाहत आहोत, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर टीका केली आहे. जनसन्मान यात्रा ही सरकारच्या पैशावर काढत असून गर्दी गोळा केली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. तसेच, या यात्रेची जबाबदारी दिलेल्या डिझाईन बॉक्स या एजन्सीला अजितदादांच्या पक्षाने २०० कोटी रुपये दिल्याचेही ते इंदापूरमध्ये बोलतांना म्हणाले.**

अजित पवार यांची जनसन्मान यात्र इंदापूरमध्ये दाखल झाली. याबाबत रोहित पवार यांनी विचारले असता त्यांनी यावर जोरदार टीका केली. आशाताई अंगणवाडी सेविकांना दम देऊन लोकांना आणायला सांगितले होते असेही रोहित पवार म्हणाले. आम्हाला गुलाबी वादळाची आम्हाला चिंता नाही असे म्हणत रोहित पवारांनी अजित पवारांना टोला लगावला. पण आज या सरकारने नीट न काम केल्यामुळे जे वादळ आला आहे ते मिटवण्यासाठी आज आम्ही इथे सगळे लढत आहोत असंही रोहित पवार म्हणाले.

### समरजित घाडगेंचा योग्य निर्णय

समरजित घाडगेंनी जसा निर्णय घेतला तसा निर्णय इंदापूरमध्ये हर्षवर्धन पाटील घेतील का? असा प्रश्न देखील रोहित पवार यांना प्रसारमाध्यमांनी विचारला होता. यावेळी ते म्हणाले की, हा निर्णय



पवार साहेबांच्या माध्यमातून केला जातो. समरजित घाडगे आमच्या पक्षाते आले त्यांचे मी स्वागत करतो, त्यांनी योग्य निर्णय घेतल्याचे रोहित पवार म्हणाले. इतर दुसऱ्या कुठल्या मतदारसंघाबाबतचा निर्णय हा शरद पवार घेतील असेही रोहित पवार म्हणाले.

### कोर्टाच्या निर्णयाचा आदर करणारी माणसं

बदलापूर घटनेच्या निषेधार्थ बंदच्या संदर्भात बोलताना रोहित पवार म्हणाले की, आपण कोर्टाच्या निकालाचा आदर करणारी माणसं आहोत. जे या महाराष्ट्रमध्ये घडत आहे. महिलांवर मुलींवर अत्याचार होत आहेत, सरकार त्याबाबत काही करत नाही, असे रोहित पावर म्हणाले. त्याबाबतच्या लोकांना स्वेच्छेने बंद ठेवायचा आहे ते ठेवू शकतील असेही रोहित पवार म्हणाले.

### सिक्युरिटी वाढवण्याची वेगवेगळी कारणे

शरद पवार यांना देण्यात येणाऱ्या झेड प्लस सिक्युरीटीबाबत रोहित पवारांना विचारण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, पवार साहेबांनी त्याबाबत उत्तर दिले आहे. सिक्युरिटी वाढवण्याची वेगवेगळी कारणे असतात. समिती असते समितीला वाटलं असेल. पण साहेब कोणाला भेटतात का? ही माहिती काढण्याचा हेतू असेल तर ते फार चुकीच असल्याचे रोहित पवार म्हणाले.

### भाजपची प्रवृत्ती फार वेगळी

भाजपची प्रवृत्ती फार वेगळी आहे. त्यांच्या मित्र पक्षाच्या जागेवर सुद्धा बीजेपी अनेक ठिकाणी अपक्ष उमेदवार उभे करेल असे रोहित पवार म्हणाले. हे उद्धव ठाकरे साहेबांना सुद्धा कळाले होते. शिंदे साहेब आणि अजितदादांना याबाबत काय कळालंय आणि ते काय निर्णय घेतात हे बघावं लागेल असंही रोहित पवार म्हणाले. इंदापूरच्या माजी आमदारांना काय वाटतं हे मला सांगता येणार नाही.

भाजप नेत्यांना विधानपरिषद देतो हेही सांगितले आहे, पण ती दिली नाही भाजप हा शब्द न पाळणारा पक्ष असल्याची टीका रोहित पवार यांनी केली. आता त्यांना मते पाहिजे आहेत. म्हणून ते इथे आले होते अशी टीका रोहित पवारांनी अजित पवार यांच्या जनसन्मान यात्रेवर केली. अंगणवाडी सेविका आशा सेविकांना विचारलं तर त्यांना धमक्या दिल्या होत्या. गेले पंधरा दिवस प्रशासकीय अधिकारी महिला गोळा करण्यामध्ये व्यस्त आहेत असे रोहित पवार म्हणाले.

### महिलांच्या बाबतीत अपशब्द काढणं अयोग्य

कुठल्याही महिलांच्या बाबतीत कोणी अपशब्द काढत असेल तर ते योग्य नाही. ही आपली संस्कृती नाही. मेहबूब शेख चित्रा वाघ यांच्याबाबत काय बोलले ते मला माहित नाही असे रोहित पवार म्हणाले. आपण संविधानिक भाषेत उत्तर दिले पाहिजे असे मला वाटते असेही ते म्हणाले. नितेश राणे यांना सागर बंगल्याचा पाठिंबा आहे, हा पाठिंबा गरिबाला का नाही? असा सवाल रोहित पवार यांनी केला आहे.

---

वाचकांच्या लेखणीतून

# माणसे वाचणारी कवयित्री बहिणाबाई चौधरी

**कालच्या २४ ऑगस्ट रोजी विदर्भकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची जयंती होती.**



बहिणाबाई या कवी सोपानदेव चौधरी यांच्या मातोश्री होत्या. आचार्य अत्रे यांच्या आग्रहामुळेच बहिणाबाई चौधरी या अशिक्षित स्त्रीचे काव्य प्रकाशात आले. बहिणाबाई चौधरी यांनी जीवनाचे तत्त्वज्ञान किती सोप्या शब्दांतून व्यक्त केले आहे!

**अरे संसार संसार**
**जसा तवा चुल्हावर**
**आधी हाताला चटके**
**तेव्हा मिळते भाकर**

ही कविता प्रत्येक मराठी माणसाला परिचित आहे. बहिणाबाईंना लिहिता वाचता येत नसले तरी त्या वृक्ष वेली, पशुपक्षी, माणूस उत्तम प्रकारे वाचू शकत! म्हणूनच त्यांच्या काव्यात सखोल चिंतन आणि सहजता आहे. अन्यथा

**दिल के किस्से कहां नहीं होते**
**हां! वोह सबसे बयां नहीं होते**

काळजाच्या कहाण्या कुठे नसतात? सगळीकडे आणि सगळ्यांकडे असतात. फक्त त्या सगळ्यांनाच वर्णन करता येत नाहीत, एवढेच! बहिणाबाईंजवळ अशा कितीतरी कहाण्या किंवा अनुभव होते. त्यांचेच वर्णन त्यांनी आपल्या काव्यातून शब्दबध्द केले आहे.

काही वेळा बहिणाबाई परखड सवाल विचारीत. एका कीर्तनकार बुवांना त्यांनी विचारले, अरे तू नुसतेच नामा म्हणे आणि तुका म्हणे काय म्हणतोस? तू काय म्हणे, ते तर सांगशील का नाही? यापुढे नामदेवतुकारामादी संतांच्या अभंग धनावर जगणाऱ्या या पोटभरू बुवांना काही उत्तर देता आले असेल? मला नाही वाटत.

अशा या माणसे वाचणाऱ्या अशिक्षित कवयित्री बहिणाबाई चौधरी यांना त्यांच्या जयंतीनिमित्त शत शत प्रणाम!

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,जि. अहमदनगर.**

---

# जखणगाव घटनेच्या निषेधार्थ रास्ता रोको आंदोलन

## अन्यथा तिव्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्याचा इशारा

जखणगाव : प्रतिनिधी

**जखणगाव येथील अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करणाऱ्या सहआरोपींना तात्काळ अटक करावी या मागणीसाठी नगर-कल्याण महामार्गावर जखणगाव येथे शुक्रवारी सकाळी दहा वाजता रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सहआरोपीना अटक न झाल्यास दोन दिवसांनी तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल, असा इशारा यावेळी पोलीस प्रशासनाला दिला. सहआरोपीना अटक केली जाईल, असे आश्वासन यावेळी तालुका पोलीस ठाण्याचे निरीक्षक प्रल्हाद गिते यांनी दिला.**

जखणगाव येथे पाच सहा दिवसांपूर्वी अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. याबाबत नगर तालुका पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीला अटक करण्यात आली. मात्र, या प्रकरणी सहआरोपींना तात्काळ अटक न झाल्यास ग्रामस्थांतर्फे रास्ता रोको आंदोलन करण्याबाबतचे निवेदन दिले होते.

जखणगाव मधील अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करण्यात आला व सदर गुन्हा दडपण्यासाठी मुलीच्या कुटुंबीयांना धमकी व अमानुष मारहाण करण्यात आली. याबाबत तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला



आहे. यात मुख्य आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. मात्र, सहआरोपी अध्यापही मोकाट फिरत आहेत व अप्रत्यक्षपणे मुलींच्या कुटुंबीयांवर दबाव व धमकी देण्याचा प्रकार घडत आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. प्रशासनातर्फे याची गंभीर दखल न घेतल्यामुळे सहआरोपी अजूनही मोकाट फिरत आहेत. पोलीस प्रशासनातर्फे या घटनेची गंभीर दखल न घेता आरोपीना मोकाट सोडून मुलीला किंवा तिच्या कुंटुबियांना काही इजा किंवा त्रास झाल्यास प्रशासन जबाबदार असेल. या घटनेचे गांभीर्य ओळखून इतर सहआरोपींना तात्काळ २४ तासांच्या आत अटक करावी, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी सरपंच डॉ. सुनील गंधे, माजी जिल्हा परिषद सदस्य संदेश कार्ले, पंचायत समिती माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार, समता परिषद तालुका अध्यक्ष रामदास फुले, बाळासाहेब कर्डिले, बाळासाहेब शहाणे, मनोहर काळे, तात्यासाहेब कर्डिले, संजय जपकर, प्रकाश कुलट, राजू नरवडे, बी.आर. कर्डिले आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

---

# मेंढपाळांच्या समस्या सोडविण्यासाठी समिती गठीत करा

## पशुसंवर्धन मंत्री विखे पाटील यांचे निर्देश

मुंबई : प्रतिनिधी

**राज्यातील मेंढपाळांच्या चराई कुरणाच्या बैठकीत मेंढपाळांच्या सर्व समस्या मार्गी लावण्यासाठी स्थायी समिती गठीत करण्याचे निर्देश राज्याचे महसूल व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री मा. राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.**

वन क्षेत्रातील मेंढपाळांच्या चराई क्षेत्रासह विविध मागण्यांवर आज मंत्री विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक पार पडली. यावेळी या बैठकीला वन व सांस्कृतिक कार्य मंत्री श्री.मुनगंटीवार यांची दूरदृश्यप्रणालीद्वारे प्रमुख उपस्थिती होती. वनमंत्री मा.सुधीर मुनगंटीवार यांनी मेंढपाळांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने स्थायी समिती स्थापन करावी अशी सूचना दिली होती. त्यानुसार अप्पर मुख्य सचिव महसूल यांच्या अध्येक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल या समितीमध्ये मेंढपाळांचे प्रतिनिधी तसेच आमदार श्री.पडळकर, म



ाजी खासदार श्री.महात्मे, वन विभाग, वित्त विभाग, पशुसंवर्धन विभागाचे सचिव यांचा सहभाग असेल, असे आदेश महसूल, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.

या बैठकीला आमदार गोपीचंद पडळकर, महसूल विभागाचे अप्पर मुख्य सचिव श्री.राजेश कुमार , श्री संतोष म हात्मे, श्री.आनंद बनसोडे यासह मेंढपाळांचे विविध जिल्ह्यातून आलेले प्रतिनिधी, म हसूल व वन विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तर माजी खासदार डॉ विकास महात्मे, दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले.

समितीच्या माध्यमातून चराई क्षेत्र म्हणून पडीक जमीन विकास करणे, वनक्षेत्रात चराईसाठी परवानगीची मागणी, प्रति मेंढी चरण्यासाठी वन वन विभागाकडून घेतल्या जाणाऱ्या शुल्का बाबतचे प्रश्न सोडविणे, मेंढपाळांसाठी चरई भत्ता, विमा योजना, चराई क्षेत्रातील बेकायदेशीर अतिक्रमण हटविणे अशी कामे करेल.१५ सप्टेंबर पर्यंत समितीचा संपूर्ण आराखडा आणि शिफारस करून समितीचे कामकाज सुरु केले जाईल असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

# मतदार याद्यांवर पडला हरकतींचा पाऊस !

## नगर शहरात ५ हजार ३२९ हरकती

नगर : प्रतिनिधी

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदार याद्यांवर हरकतींचा पाऊस पडला आहे. तब्बल ३९ हजार २३१ ऑनलाइन व ऑफलाइन दावे आणि हरकती आल्या आहेत. सर्वाधिक नगर ३९ शहर मतदार संघातील ५ हजार ३२९ हरकती आल्या आहेत.** जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघात निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ जुलै २०२४ या अर्हता तारखेवर आधारीत छायाचित्र मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. नावात बदल, पत्ता बदल करणे व स्थलांतर यासाठी ७ हजार ५७९ हरकती आल्या आहेत. मयत, दुबार, स्थलांतरित म तदारांची नावांची वगळणी करण्यासाठी ९ हजार ६१९ हरकती घेण्यात आल्या. जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघात आतापर्यंत ३६ लाख ७३ हजार ९६९ मतदार आहेत. २९ ऑगस्ट रोजी दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. ३० ऑगस्ट रोजी अंतिम यादीची प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

---

# पोखरीच्या प्रफुल करंजेकरची राष्ट्रीय वुशू स्पर्धेसाठी निवड

## ५२ किलो वजनगटात प्रथम क्रमांक

पोखरी : प्रतिनिधी

**पुण्याच्या गुलटेकडी येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य सिनियर ओपन वुशू निवड चाचणी घेण्यात आली त्यामध्ये ५२ किलो वजन गटात प्रफुल सुभाष करंजेकर यांनी पहिला क्रमांक पटकावून राष्ट्रीय स्पर्धेचे तिकीट मिळवले आहे.**

प्रफुल याची पहिलीच सिनियर स्पर्धा होती त्यात त्याला यश आले आहे. या आगोदर ज्युनियर राष्ट्रीय स्पर्धेसाठी दोनदा तर राष्ट्रीय सिनियर स्पर्धेत पहिल्यांदाच निवड झाली आहे. प्रफुल्ल करंजेकर हा पोखरी, ता. पारनेर गावचे मा. उपसरपंच सुभाष करंजेकर यांचा मुलगा आहे. १९ वर्षीय प्रफुल्ल करंजेकर कॉमर्सचे दुसऱ्या वर्षाला आहे.

वुशु खेळात प्रफुल्लने आतापर्यंत अमरावती, नागपूर, पुणे, छत्रपती संभाजीनगर, माळशिरस, शिरूर येथे स्टेट लेव्हलला



खेळला तर पंजाब येथील जालंधर, बिहार येथील पटना, उत्तराखंड येथील डेहराडून येथे नॅशनल स्पर्धा खेळला आहे. आणि आता च्या स्टेट लेव्हल च्या स्पर्धेत त्याची फायनल फाईट मुंबईच्या साहिल भंडारी या मुलासोबत झाली.

राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल त्याचे त्यांच्या प्रशिक्षिका प्रिया बनकर,

भोसरी विधानसभेचे आ. महेशदादा लांडगे, महाराष्ट्र वुशू गेमचे अध्यक्ष सोपान कटके, बांधकाम व कृषी समितीचे सभापती काशिनाथ दाते सर, मा. उपसरपंच सुभाष करंजेकर, सरपंच सतीश पवार, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, मा. उपसरपंच परसराम शेलार, बाबा शिंदे, सोपान दुरगुडे नितीन पवार, राज्य पत्रकार संघाचे पारनेर तालुका अध्यक्ष संतोष तांबे, मा.चेअरमन ज्ञानदेव पवार, बबन करंजेकर, गणेश शिंदे, गवराम दरेकर, अण्णा खैरे, संतोष खैरे, सागर काशीद, बाबा वाकळे, बाळशीराम शिंदे, योगेश पवार, विजू खैरे मेजर, अशोक खैरे, मधुकर शिंदे, संदीप फरतारे, दिलीप करंजेकर, पोखरी ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले तसेच भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहे. सागर मोहिते, रोहित राऊत, ज्ञानेश्वर राऊत, प्रवीण संधान, दिलीप थापा यांनी त्याला उत्कृष्ट मार्गदर्शन केले. सध्या प्रफुल्ल करंजेकर माऊली स्पोर्ट्स भोसरी येथे सराव करत आहे.

### तालुक्याचे नाव देशाच्या पटलावर झळकेल

*पोखरी गावासह पारनेर तालुक्याचे नाव एक दिवस देशाच्या पटलावर अधोरेखित करण्याचे काम राष्ट्रीय खेळाडू प्रफुल्ल करंजेकरच्या माध्यमातून होईल असा विश्वास नक्कीच मला आहे. प्रफुल्लला पुढील वाटचालीस माझ्या शुभेच्छा.*

***- सभापती काशिनाथ दाते, सर***

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेवर पारनेर महाविद्यालयाची छाप

## सहा विद्यार्थ्यांचा प्रथम तर दोघांचा द्वितीय क्रमांक

पारनेर : प्रतिनिधी

**शहरातील शिवछत्रपती कुस्ती संकुलात पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत पारनेर महाविद्यालयाच्या कुस्तीपटूंनी छाप पाडली. स्पर्धेत सहभागी झालेल्या महाविद्यालयाच्या ११ कुस्तीपटूंपैकी ६ जणांनी प्रथम तर दोघांनी द्वितीय क्रमांक मिळविला.**

क्रीडा व युवक सेवा संचनालय व जिल्हा क्रीडा कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. पारनेर महाविद्यालय व न्यू इंग्लिश स्कुलच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेत चुरशीच्या लढती होऊन कुस्तीचा थरार पहावयास मिळाला. स्पर्धेत पारनेर महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कुल, अभिनव विद्यालय शिरापूर, साईनाथ हायस्कुल अळकुटी, किसान इंटरनॅशनल स्कुल पारनेर आदी शाळांनी सहभाग नोंदविला.

यशस्वी विद्यार्थ्यांची २८ ते ३० ऑगस्ट दरम्यान कर्जतच्या दादा पाटील महाविद्यालयात पार पडणाऱ्या जिल्हास्तरीय कुस्तीस्पर्धेसाठी निवड झाली आहे. या स्पर्धेत पंच म्हणून गणेश जाधव, शुभम जाधव, मयुर रोहोकले यांनी काम पाहिले. किसान स्कुलचे ऋषिकेश औटी यांनी सुत्रसंचलन केले.

विजयी खेळाडूंचे प्राचार्य डॉ. लक्ष्मण मतकर, उपप्राचार्य डॉ. तुकाराम थोपटे, पर्यवेक्षक संजय कोल्हे, डॉ. संजय गायकवाड, सावकार काकडे, प्रा. गंगाराम खोडदे, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

### महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे

*कुस्ती हा ग्रामीण भागातील सर्वांचा आवडात क्रीडा प्रकार असून आता महिलाही या क्रीडा प्रकारात कर्तुत्व सिध्द करत आहेत. या स्पर्धेत सहभागी खेळाडूंनी खेळात नैपुण्य प्राप्त करून महाविद्यालयाचे नाव उज्वल करावे.*

*– **डॉ. लक्ष्मणराव मतकर**, प्राचार्य, पारनेर महाविद्यालय*



पारनेर येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत पारनेर महाविद्यालयाच्या कुस्तीपटूंनी छाप पाडली.

### विजयी खेळाडू

*योगराज गणेश वामन ९२ किलो प्रथम, अविष्कार भास्कर नरसाळे ६१ किलो.*

### १९ वर्षे वयोगट

*आयशा शकुर शेख ५५ किलो प्रथम, यश धनंजय साठे ६५ किलो प्रथम, विक्रम साहेबराव पवार ६७ किलो प्रथम, विक्रांत मानसिंग आढाव ९७ किलो प्रथम*

---

# पारनेर पतसंस्थेच्या सभासद वारसाला अपघात विमा

## तीन लाखाचा धनादेश काशिनाथ दाते यांच्या हस्ते सुपूर्द

टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी

**पोखरी घाटात दुचाकीला पिकअपने धडक दिल्याने डोक्याला मार लागून मयत झालेले पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे सभासद बबन दगडू शिंदे यांच्या वारसांना पतसंस्थेच्या वतीने तीन लाख रूपयांच्या अपघात विम्याचा धनादेश पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ दाते यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला.**

शिंदे यांचे अपघाती निधन झाल्यानंतर त्याबाबत दाते यांना माहीती देण्यात आली. दाते यांनी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांना शिंदे यांच्या अपघाताची माहीती संकलीत करून विमा रक्कमेचा धनादेश वारसांना देण्याबाबत सुचना दिल्या होत्या. शिंदे हे पतसंस्थेचे कर्जदार असल्याने कर्जाचा दोन लाखांचा तर अपघाताचा एक लाखांच्या विम्याची संस्थेच्या वतीने तरतुद करण्यात आली होती.

व्यवस्थापक थोरात यांनी युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनीकडे पाठपुरावा करून आवष्यक ती कागदपत्रे सादर केली. कंपनीच्या वतीने दि.२० ऑगस्ट रोजी तीन लाख रूपये संस्थेकडे वर्ग करण्यात आले.या रकमेचा धनादेश संस्थापक अध्यक्ष दाते यांच्या हस्ते मयत बबन शिंदे यांचे वारस पत्नी सिताबाई, मुलगा शुभम यांच्याकडे सुपूर्द केला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात, शुभम पवार, नियाज राजे, प्रशांत जवक आदी उपस्थित होते.

### विम्याच्या रूपाने मोठी आर्थिक मदत

*काशिनाथ दाते सर हे आमच्या परिसराचे कुटूंबप्रमुख आहेत. पोखरी परिसरातील प्रत्येकाच्या सुख, दुःखात दाते सर सहभागी होतात. पारनेर ग्रामीण पतसंस्थेच्या वतीने प्रत्येक सभासदाराचा विमा उतरवत असल्याने वडिलांच्या अपघाती मृत्यूनंतर विम्याच्या रूपाने आमच्या कुटूंबास मोठी आर्थिक मदत झाली आहे.*

***–शुभम बबन शिंदे***



पारनेर ग्रामीण पतसंस्थेचे मयत सभासद बबन शिंदे यांच्या वारसांना विम्याचा धनादेश काशिनाथ दाते यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

---

# धार्मिक संस्कृतीचे जतन करण्यासाठी पुढाकार घ्या

## उद्योजक शिवाजीराव लंके यांचे मत

निघोज : प्रतिनिधी

**धार्मिक संस्कृतीचे जतन करण्यासाठी व ही धार्मिक संस्कृती माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्याची आज खऱ्या अर्थाने गरज असून यासाठी युवकांनी पुढाकार घेण्याची गरज असल्याचे मत मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष व किशन कन्हैया दूध उद्योग समूहाचे सर्वेसर्वा शिवाजीराव लंके यांनी व्यक्त केले आहे.**

उपसरपंच माऊली उर्फ ज्ञानेश्वर वरखडे यांच्या नेतृत्वाखाली संकष्टी चतुर्थीच्या दिवशी परिसरातील बहुसंख्य युवकांनी रांजणगाव गणपती दर्शन घेण्यासाठी निघोज ते रांजणगाव असे पायी दिंडी वारीचे आयोजन करण्यात आले होते. याबद्दल त्यांचा सत्कार व्यापारी असोसिएशनचे ज्येष्ठ मार्गदर्शक भिमाशेठ घुले, जय बजरंग मंडळांचे ज्येष्ठ मार्गदर्शक पांडुरंग लामखडे, लंके भावकीचे ज्येष्ठ मार्गदर्शक गवरामशेठ लंके, शिवव्याख्याते प्रा.ज्ञानेश्वर कवाद, वराळ भावकीचे ज्येष्ठ कारभारी भास्करराव वराळ पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी लंके म्हणाले सर्वधर्मसमभाव ही काळाची गरज आहे.आज आरक्षण या विषयावर समाजामध्ये मतभेद होत आहेत ही शोकांतिका आहे यासाठी धार्मिक संस्कृतीचा विसर न पडता कार्य करीत राहाणे आणि त्यातून सेवाभाव करीत समाजसेवा माध्यमातून सर्वसामान्य जनतेला पाठबळ देणे ही गरज आहे.

उपसरपंच माऊली वरखडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी माता मळगंगा देवीचे दर्शन घेऊन निघोज ते रांजणगाव पायी वारी करीत गणपती बाप्पाचे दर्शन घेऊन सर्वांच्या सुख समृद्धीसाठी बाप्पाचा आशीर्वाद घेतला अशाप्रकारे धार्मिक संस्कृती जतन करण्याचे काम होण्याची गरज असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. यावेळी उपसरपंच माऊली वरखडे यांनी सांगितले की या पायी वारीसाठी मळगंगा यात्रा उत्सव समितीचे अध्यक्ष शिवाजीराव लंके यांनी नाष्टा चहापाणी व्यवस्था केली होती. लंके यांनी यात्रा उत्सव असो बैलगाडा शर्यत असो की अखंड हरिनाम सप्ताह असो प्रत्येक ठिकाणी सहकार्य करीत मोठया प्रमाणात आर्थिक योगदान दिले आहे.

या पायीवारीची संकल्पना अनेक सहकाऱ्यांनी बोलून दाखवली होती त्याप्रमाणे प्रत्येक वर्षी गणपती उत्सव सुरू होण्याअगोदर येणाऱ्या संकष्टी चतुर्थीला पायी दिंडी वारीचे आयोजन करण्यात येणार असून पुढील वर्षी पाचशे युवकांचा सहभाग असल्याची माहिती वरखडे यांनी दिली आहे.



निघोज ते रांजणगाव पायी दिंडी सोहळा माध्यमातून धार्मिक संस्कृतीचे जतन करणाऱ्या युवकांचा सत्कार करण्यात आला.

---

# बदलापूर, कोलकत्त्याच्या घटनांचा निषेध

## पारनेरातील मुस्लिम महिला एकवटल्या

पारनेर : प्रतिनिधी

**बदलापूर, ठाणे येथील लहान मुलींचे लैंगिक शोषण आणि बलात्काराचा प्रयत्न तसेच पश्चिम बंगालमधील कोलकत्ता येथील मेडीकल कॉलेजमध्ये प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर बलात्कार व हत्या प्रकरणाचा पारनेर शहरातील मुस्लिम महिलांनी निषेध केला. या प्रकरणी दोषींवर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.**

यासंदर्भात तहसिलदार गायत्री सौंदाणे यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, बदलापूर प्रकरणातील आरोपीविरोधात न्यायालयात जलद गतीने खटला चालवून कठोर शिक्षा देण्यात यावी. ज्या शाळेत हा प्रकार घडला त्या शाळेच्या अधिकाऱ्यांना सुरक्षा आणि संरक्षण निकषाचे पालन न केल्याबद्दल तसेच स्त्री परिचारिका, सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याबाबत दोषी ठरवून कारवाई करण्यात यावी, ज्या पोलीसांनी एफआयआर नोंदविण्यात उशिर केला त्या बदलापूर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी.

कोलकत्तामधील प्रशिक्षीत डॉक्टरवरील अत्याचार प्रकरणी पीडीतेचे शरीर अनेक जखमांसह आढळून आल्याचे वृत्त वाचून आम्ही हादरलो आहोत. ज्यात लैंगिक अत्याचाराचे, गळा आवळयाचे पुरावे आहेत. या दोन्ही गुन्हयांच्या भयंकर स्वरूपामुळे संपूर्ण देशात खळबळ उडाली आहे. भारतातील महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा तातडीने चर्चेला घेण्याची आवश्यकता निर्माण झालल असून विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि काम करणाऱ्या मुली, महिलांमध्ये ही काळजी घेणे गरजेचे असल्याचे या निवेदनात नमुद करण्यात आले आहे. या प्रकरणांची सर्वसमावेशक चौकशी करून पीडीतांना न्याय मिळवून देण्यासाठी कायदा आणि सुव्यवस्थेवरील विश्वास पुनस्थापित करावा, सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये सुरक्षा कॅमेरे, चांगली प्रकाश योजना, आपत्कालीन प्रतिसाद प्रणाली अशी कडक सुरक्षा नियमावली राबविण्यात यावी, महिलांचा आदार वाढविण्यासाठी, लैंगिक हिंसाचाराबद्दल जनजागृती करण्यासाठी शैक्षणिक उपक्रमांची आवश्यकता आहे. समाजाच्या स्तरावर सहमतीच्या महत्वाविषयी आणि महिलांविरूध्द हिंसाचाराचे गंभीर परिणाम यासाठी जागरूकता कार्यक्रम आयोजित करावेत, लैंगिक हिंसाचाराच्या पीडीतांना सल्ला, कायदेशीर सहाययता, वैद्यकीय काळजीसह समर्पित सहाययता प्रणालींची स्थापना करावी ज्यामुळे पीडीतांनी पुढे येउन गुन्हयांची नोंद करणे सोपे होईल, कायदा अंमलबजावणी यंत्रणेमध्ये जबाबदारी निश्चित करण्याची मागणी करतो ज्यामुळे सर्व अधिकारी, नागरीकांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य पार पाडतील, महिलांवर होणाऱ्या हिंसाचाराच्या तक्रारींवर तात्काळ कारवाई करतील, शाळांमध्ये नैतिक शास्त्राची शिकवण सुरू करण्यात यावी, चरित्र निमणाच्या कामावर भर देण्यात यावा, मुख्य प्रवाहातील माध्यमे, सामाजिक माध्यमे, मनोरंजन उद्योगात उघडपणे चालवले जाणारे अश्लिलता, अशिष्टता, महिलांचे वस्तूकरण आणि अश्लीलतेला आळा घालण्याची आणि त्याची नियंत्रण करण्याची आवश्यकता आहे. लैंगिक गुन्हयांवर नियंत्रण ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे एक पवित्र आणि परमेश्वर भीती समाजात निर्माण करणे, जिथे महिलांचा सन्मान केला जातो आणि त्यांना खरे आणि प्रतिष्ठित स्थान दिले जाते अशा मागण्या या महिलांनी केल्या.

मुस्लिम महिलांच्या शिष्टमंडळात जमात ए इस्लामी हिंदच्या पारनेर विभागाच्या प्रमुख फरजाना रफीक सययद, शगुप्ता मोमीन, गुलनाज सययद, इरम सययद, शकिला शेख, सुलताना राजे, शाहीन मोमीन, सायरा सययद, हाजरा शेख, आस्मा राजे, बिल्किस शेख, आयेशा मोमीन, तबस्सुम राजे यांचा समावेश होता.

पारनेर शहरातील मुस्लिम महिलांनी तहसिलदार गायत्री सौंदाणे यांना निवेदन सादर करून बदलापूर तसेच कोलकत्त्याच्या घटनांचा निषेध नोंदविला.





---

# हिरो मोटोकॉर्पकडून उदय ऑटोमोबाइलचा सन्मान

## संचालक उदय शेरकर यांचा विशेष सत्कार

पारनेर : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील उदय ऑटोमोबाईल या फर्मने २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात हिरो कंपनीच्या नुसार उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल विशेष सन्मान करण्यात आला**

नाशिक येथील एक्सप्रेस इन् या ठिकाणी झालेल्या बैठकीत इलाक्षी ऑटो सेल्स या अंतर्गत सब डीलर असलेल्या उदय ऑटोमोबाइल्स या फर्मने उल्लेखनीय कामगिरीबद्दल उदय ऑटोमोबाइल्सचे संचालक उदय शेरकर यांचा मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.यावेळी हिरो मोटोकॉर्प चे विभागीय अधिकारी अखिलेश तिवारी,उमेश तिवारी,अभय देवकर ,इलाक्षी ऑटो सेल्सचे प्रमुख विजय यशवंत गडाख पा. ,कार्यकारी व्यवस्थापक रामदास खांदवे,हर्षल पवार ,सेलस व्यवस्थापक नितीन बोरसे व प्रमोद कार्ले आदी उपस्थित होते.



---

# वडगाव गुंड येथील हरिनाम सप्ताहास प्रतिसाद

## श्रीकृष्ण जनमोत्सावानिमित्त आयोजन

निघोज : प्रतिनिधी



**निघोज परिसरातील वडगाव गुंड येथील अखंड हरिनाम सप्ताहास भाविकांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत असून श्रीकृष्ण जन्मोत्सव निमित्ताने होत असलेल्या या सप्ताहाचे हे ३८ वे वर्ष आहे.**

भाऊसाहेब महाराज गट, गणेश महाराज घोडके, तुषार महाराज गुंड, मोहिनीताई महाराज पाबळे आदिंचे किर्तने गेली चार दिवसात झाली असून निघोज, वडगाव गुंड, शिरसुले, देवीभोयरे पंचक्रोशीतील भावीक मोठ्या संख्येने उपस्थित राहुन हरिनामाच्या गजराने वडगाव गुंड येथील पावण भुमीत पंढरी अवतरली आहे.

नरहरी महाराज सांगळे , सचिन महाराज चकवे, बालाजी महाराज उगले आदिंचे किर्तने उर्वरित चार दिवसांत होणार आहेत. मंगळवार दि.२७ रोजी सकाळी आठ ते नऊ या वेळेत श्री नवनाथ ग्रंथासमवेत टाळ, मृदुंग,विणा, ढोल, लेझिम व हरिनामाच्या जयघोषात, ग्रामप्रदक्षिणा संपन्न होणार आहे. मंगळवार दि.२७ रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत बालाजी महाराज उगले यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

---

# हत्तलखिंडीतील केटी वेअरमुळे १०० एकर शेती समृद्ध

## खा. नीलेश लंके यांच्या प्रयत्नातून बंधाऱ्यासाठी ८६ लाखांचा निधी

हत्तलखिंडी : प्रतिनिधी

**खासदार नीलेश लंके यांच्या प्रयत्नातून हत्तलखिंडी येथील ओढयावर कोल्हापुर पध्दतीचा बंधारा बांधण्यासाठी ८६ लाख रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला असून नुकतेच हे काम पुर्ण झाले. या बंधाऱ्यामुळे १०० एकर शेती समृध्द होणार आहे.**

डोंगर रांगांनी वेढलेले हत्तलखिंडी गाव स्वातंत्र्य प्राप्तीपासून विकासापासून तसे कोसो दुर होते. सन २०१९ च्या निवडणूकीत नीलेश लंके यांनी विजय संपादन केल्यानंतर या गावाच्या विकासाचा बॅकलॉग भरून काढण्याचा शब्द दिला होता. गावातील रस्ते, सभामंडपाबरोबरच जलसंधारणावरही लक्ष देण्यात आले. हत्तलखिंडीतील ओढयावर बंधारा बांधल्यास वाहून जाणारे पाणी आडविले जाउन शेतीसाठी त्याचा फायदा होईल ही बाब खा. लंके यांचे युवा सहकारी महेंद्र गायकवाड यांनी लंके यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर लंके यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना ओढयावर बंधारा बांधण्यासाठी सर्वेक्षण करण्याच्या सुचना दिल्या होत्या. सर्वेक्षण होऊन ओढयावर बंधारा बांधणे शक्य असल्याचा अहवाल आल्यानंतर लंके यांनी या बंधाऱ्यासाठी निधी मंजुर करून आणला.

निधी मंजुर होऊन बंधाऱ्याचे कामही पुर्ण झाले आहे. ओढयाने वाहून येणारे पाणी बंधाऱ्यात आडविले जाऊ लागले असून या हंगामापासून परीसरातील शंभर एकर शेतीला या बंधाऱ्यातील पाण्याचा फायदा होणार आहे.

### खा. लंके यांच्याप्रती कृतज्ञता

*खा. नीलेश लंके यांच्याकडे आम्ही विविध कामांची मागणी केल्यानंतर त्यांनी कोणत्याही कामास नकार न देता गावाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपण निधी मंजुर करून देण्यासाठी कटीबध्द असल्याची ग्वाही दिली होती. त्यांच्या पुढाकारातून कोल्हापुर पध्दतीचा बंधारा पुर्ण झाला असून त्यामुळे शेती समृध्द होणार आहे. आम्ही हत्तलखिंडीकर खा. लंके यांच्याप्रती कृतज्ञ आहोत.*

***महेंद्र गायकवाड**, खा. लंके यांचे सहकारी*



खा. नीलेश लंके यांच्या प्रयत्नातून मंजुर करण्यात आलेल्या ८६ लाख रूपये खर्चाच्या कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्याचे काम पुर्ण झाले आहे.